ISSN : 2393-8900

# Historicity

## International Research Journal

Volume - 9 | Issue - 2 | October - 2022
Impact Factor : 2.7825(UIF)



Editor-In-Chief
Dr. Sanjay Gaikwad

**Chief Patron**

**Dr.Vasant Shinde**

Director/Vice-Chancellor

Deccan College,Deemed University,Pune, Maharashtra

**Editor-In-Chief**

**Dr.Sanjay Gaikwad**

M.H.Mahadik Arts and Commerce College, Modnimb. Solapur, Maharashtra

**Editor**

**Dr.Ravikiran Jadhav**

D.B.F Dayanand College Of Arts & Sc

Solapur, Maharashtra

**Review Board:**

**Dr.Mahalingam**
Madurai, Tamilnadu.

**Dr.Smita Surebankar**
Belgaon, Karnataka.

**Dr. Anura Mantunga**
Sri Lanka.

**Dr.S.K Kallolikar**
Dharwad, Karnataka.

**Dr.Nimal Parera**
Shrilanka.

**Dr. Sanjay Gaikwad**
Solapur, Maharashtra.

**Dr. Jenee Peter**
Ernakulam, Kerala.

**Dr. Ravikiran Jadhav**
Solapur, Maharashtra.

**Dr. Shanti Pappu**
Chennai, Tamil Nadu.

**Advisory Board:**

**Dr. Deepak Gaikwad**
Pune, Maharashtra

**Dr. Satish Kapoor**
Jalandhar, Panjab

**Dr. Kishor Gaikwad**
Mumbai, Maharashtra.

**Dr. Lalit Pandey**
Udaipur, Rajasthan

**Dr. M. A Khan**
Raipur, Chhatisgarh

**Dr. Vankatesha V.**
Belgaum, Karnataka.

**Dr.S.K Kallolikar**
Dharwad, Karnataka.

**Dr.Pradip Meshram**
Nagpur, Maharashtra.

**Dr. V. H Sonawane**
Vadodara, Gujarat.

**Prin. Somnath Rode**
Latur, Maharshtra

**Dr. Binda Paranjape**
Banaras, Uttar Pradesh

**Dr. Aradhana Kumari**
Amroha, Uttar Pradesh.

**Dr. Rambabu Meher**
Hoshangabad, Madhya Pradesh.

**Dr. Dadu Mandrekar**
Goa

**Dr.Smita Surebankar**
Belgaum, Karnataka.

**Dr. Jenee Peter**
Ernakulam, Kerala.

**Dr. Anura Mantunga**
Sri Lanka.

**Dr. Pundhir M.K**
Aligarh, Uttar Pradesh.

**Dr. Manjula B. Chincho**
Gulbarga, Karnataka.

**Dr. Shanti Pappu**
Chennai, Tamil Nadu

**Dr. S.V Jani**
Rajkot, Gujarat

**Dr.Mahalingam**
madurai, Tamilnadu.

**Dr.Nimal Parera**
Shrilanka.

HISTORICITY RESEARCH JOURNAL
ISSN NO:- 2393-8900
Vol- 9| Issue 2 | Oct -2022

## Contents

1 राजश्री शाहू महाराज, मुस्लिम समाज आणि उत्क्रमशील धर्मविचार
Dr. Ladaf S. K.

8 "वारकरी संप्रदायाचे बदलते स्वरूप"
डॉ. संजय गायकवाड

13 महाराष्ट्रातील होमरूल चळवळीचे स्वरूप व भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील योगदान
डॉ. एस. आर. कट्टीमनी.

20 महात्मा जोतीराव फुले यांचे पाणी व्यवस्थापन विषयक विचार : एक अभ्यास
श्री. मुकुंद का. गोरे , प्रा.डॉ.नंदकुमार बोधगीरे

26 सन् 1857–58 ई. के विद्रोह में होशंगाबाद[1] क्षेत्र के कुछ गोंड विद्रोही
डॉ. रामबाबू मेहर

ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 9 | ISSUE - 2 | OCTOBER - 2022

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# महाराष्ट्रातील होमरूल चळवळीचे स्वरूप व भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील योगदान



डॉ. एम. आर. कट्टीमनी
सहाय्यक प्राध्यापक , इतिहास विभागप्रमुख,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)
शिवाजी विद्यापीठ संलग्नित

घोषवारा:

भारतीय स्वातंत्र्यलढा ही एक बहुआयामी बाब म्हणून ओळखली जाते आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये विविध संस्था संघटना, व्यक्ती व चळवळींचे महत्वपूर्ण योगदान राहिले आहे यामध्ये लोकमान्य टिळकांनी महाराष्ट्रात सुरु केलेल्या होमरूल चळवळीचे स्थान महत्वपूर्ण असे आहे. वंगभंग आंदोलनाच्या यशस्वीतेनंतर राष्ट्रीय आंदोलनाचा मंदावलेला वेग पुन्हा गतिमान करण्यासाठी लोकमान्य टिळक व अॅनी बेझंट यांच्या होमरूल चळवळीने दिलेले योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते 1914 ते 18 या काळात युरोपमध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले या काळात ब्रिटिशांकडून राजकीय मागण्या पूर्ण करून घेता येतील अशी धारणा लोकमान्य टिळकांची होती भारतीय स्वातंत्र्य चळवळीस नवचैतन्य निर्माण करण्याच्या लोकमान्य टिळकांच्या विचारांचे दृश्यस्वरुप म्हणजे होमरुल चळवळ होय. डॉ. अॅनी बेझंट, लोकमान्य टिळक व जोसेफ बॅप्टिस्टा यांच्या नेतृत्त्वाखाली भारतात ही चळवळ घडून आली. होमरुल लीगच्या विविध संघटना भारतात अस्तित्वात आल्या. परंतु ही चळवळ मात्र एकच होती होमरुल चळवळीने भारतीय स्वातंत्र्य चळवळीस अधिक गतिमान करण्याचे काम केले. मुंबई कानपूर, अलाहाबाद, कलकत्ता व मद्रास या ठिकाणी होमरूल लीगच्या संघटना स्थापन झाल्या होत्या. प्रस्तुत शोधनिबंधातूनमहाराष्ट्रातील होमरूल चळवळीचे स्वरूप व भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील योगदमाचा अभ्यास केला जाणार आहे.

कळीचे शब्द : बहुआयामी बाब, जडणघडण, होमरूल लीग, वंगभंग आंदोलन भारतीय स्वातंत्र्यलढा...

## प्रस्तावना :

भारतीय स्वातंत्र्यलढ्यामध्ये होमरुल चळवळीस महत्वाचे स्थान आहे 1905 मध्ये बंगालच्या फाळणीनंतर भारतीयांचा असंतोष वंगभंग आंदोलनाच्या द्वारे प्रकट झाला हिंदू मुस्लीम एकीचे दर्शन झाल्याने ब्रिटीशानी या संघटीत राष्ट्रभावनेला आवर घालण्यासाठी फोडा आणि राज्य करा नीती अवलंबली . व्हाईसराय लॉर्ड मिंटो यांनी सिमला परिषदेद्वारे भारतात सांप्रदायिकतेला चालना दिलीव ब्रिटीशांच्या प्रोत्साहनातून सन 1906 मध्ये मुस्लीम लीगची स्थापना ढाका येथे झाली राष्ट्रीय सभेपासून दूर राहण्यातच आपला स्वार्थ आहे असे मुस्लिम नेत्यांना वाटत होते. 1909 च्या मोर्ले मिंटो सुधारणा कायद्याने मुस्लिमांना स्वतंत्र मतदार संघ मिळाल्याने ब्रिटीशांप्रती मुस्लीम लीगला विश्वासाची व आपलेपणाची भावना निर्माण झाली. परंतु ब्रिटिश सरकारने सन १९११ मध्ये बंगालची फाळणी रद्द केल्याने स्वाभाविकच ब्रिटिशांनी आपले स्वप्न भंग केला आहे असे मुस्लिम नेत्यांना वाटू लागले 1908 ते 1914 अशी सहा वर्षे लोकमान्य टिळक हे ब्रह्मदेशातील मंडालेच्या कारावासात होते या काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस थंडावल्याचे व ज्यामध्ये मरगळ आल्याचे दिसून येते

1914 साली टिळक मंडालेहून सुटून आल्यानंतर राष्ट्रीय चळवळीत त्यांनी नव्याने प्राण फुंकण्याचा प्रयत्न सुरू केला त्यांनी राष्ट्रीय चळवळीला आलेली मरगळ झटकून टाकण्यासाठी व ती पुन्हा सक्रीय करण्यासाठी होमरूल द्वारे प्रयत्न सुरु केले . होमरूल

चळवळीद्वारे अहिंसेचा वापर न करता ब्रिटिश सरकारकडून भारतीय वसाहतीला स्वराज्य द्यावे यासाठी प्रयत्न केले गेले.याप्रसंगी भारतीयांना राजकीय शिक्षण देऊन ब्रिटिश सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न झाला. पहिल्या महायुद्धात ब्रिटीशांनी भारतीय संसाधनांचा राजरोसपणे वापर केला आणि त्याची भरपाई करण्यासाठी भारतीयांवर भारी कर लादले गेले, परिणामी होमरूल लीग चळवळीत भारतीयांनी सक्रिय सहभाग घेतला. पहिल्या महायुद्धामुळे ब्रिटीश अजिंक्य असल्याचा भ्रमही भारतीयांचा तुटल्याने ही चळवळ अतिशय सक्रिय बनलीप्रस्तुत शोधनिबंधातून होमरूलचळवळीच्या विविध पैलूंचा अभ्यास केला आहे

शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये:
1. होमरूल चळवळीचा अर्थ , स्वरूप व महत्व अभ्यासणे
2. होमरूल चळवळीच्या उद्याची पार्श्वभूमी अभ्यासणे.
3. होमरूल चळवळीच्या परिणामांची चिकित्सा करणे.
4. महाराष्ट्रातील होमरूल चळवळीचा भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाची मीमांसा करणे

होमरूल चळवळीची कारणे :

या काळात गोपाळकृष्ण गोखले व त्यानंतर 5 नोव्हेंबर 1915 रोजी फिरोजशहा मेहता यांचा मृत्यू झालामेहता मृत्यू पावल्यानंतर मुंबई इलाख्यातील मवाळ गटाचा मोठा आधार तुटला जहालांच्या काँग्रेस प्रवेशाच्या मार्गातील मोठा अडसरही दूर झालाब्रिटिशांच्या धोरणावर नाराज असलेल्या मुस्लिम लीगनेही राष्ट्रीय सभेला सहकार्य करण्याचे मान्य केले होते अशा सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर होमरूल चळवळीचा निर्णय घेण्यात आला.

लोकमान्य टिळक आणि ॲनी बेझंट यांनी स्थापन केलेली होमरूल लीग ही पहिल्या महायुद्धात भारतातील एक महत्त्वाची राष्ट्रवादी प्रतिक्रिया होती. पहिल्या महायुद्धाच्या सुरुवातीला ब्रिटीश सरकारने भारताचाही युद्धात समावेश केला होता ब्रिटनने भारतीयांच्या परवानगीशिवाय भारतीय मनुष्यबळ आणि संसाधनांचा युद्धात मोठ्या प्रमाणावर वापर केला यामुळे भारतावरील राष्ट्रीय कर्ज 30% वाढले, ज्यामुळे भारतीय लोकांच्या त्रासात प्रचंड वाढ झाली या सर्वांचा भारतीय राष्ट्रीय चळवळीवर बहुआयामी प्रभाव पडला सुरुवातीला भारतीय राष्ट्रीय नेत्यांनी ब्रिटनच्या युद्ध प्रस्तावाचे स्वागत केले आणि त्याला व्यापक पाठिंबा दिलाया निष्ठेचे बक्षीस म्हणून ब्रिटिश सरकार त्यांची राजकीय सुधारणांची मागणी पूर्ण करेल या हेतूने हे केले गेलेभारतात हळूहळू जबाबदार सरकार स्थापन करणे हे ब्रिटनचे ध्येय असल्याचे ब्रिटिश सरकारने जाहीर केले. परंतु युद्धानंतर घोषित केलेल्या सुधारणांमुळे राजकारणी आणि जनतेमध्ये मोठ्या प्रमाणावनाराजी पसरली.

गृहीतके :
1. वंगभंग चळवळीच्या नंतर मंदावलेली भारतीय स्वातंत्र्य लढ्याची चळवळ होमरूल चळवळीने पुन्हा सुरु केली
2. होमरूल चळवळीने टिळकांचे अखिल भारतीयनेतृत्व सिद्ध केले.
3. होमरूल चळवळीने भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या प्रश्नास आंतरराष्ट्रीय व्यासपीठउपलब्ध करून दिले .
4. होमरूल चळवळीने भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या उभारणीमध्ये व जडणघडणीमध्ये महत्वपूर्ण योगदान दिले

संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला असून त्यासाठी महत्वपूर्ण प्राथमिक- दुय्यम साधने, समकालीन वृत्तपत्रे, महत्वपूर्ण कागदपत्रे व कोल्हापूर शासकीय पुराभिलेखागाराचा वापर केला आहे तसेच लोकमान्य टिळकांच्या होमरूल चळवळीच्या प्रसारार्थ आयोजित सभांच्या वेळी केलेली भाषणे , त्यांचे वर्तमानपत्रातील अग्रलेख व त्यांच्या राजकीय पत्रव्यवहाराचा व तसेच इंटरनेटवरील काही संकेत स्थळांचा वापर केला आहे.

### बेळगावची मुंबई प्रांतिक परिषद

बेळगावच्या मुंबई प्रांतिक परिषदेचे अध्यक्षस्थान दादासाहेब खापर्डे यांनी भूषवले या परिषदेस बापुजी अणे, मुंजे, जोसेफ बॅप्टीस्टा इत्यादी नेते उपस्थित होते. बेळगावच्या परिषदेस महात्मा गांधीही उपस्थित होते ज्यामध्ये त्यांनी भाषणही केले यावेळी जोसेफ बॅप्टीस्टा यांची निवड होमरूल लीगचे अध्यक्ष म्हणून चिटणीस म्हणून न. चि. केळकर व दुय्यम चिटणीस म्हणून दावि.गोखले यांची निवड करण्यात आली.

काँग्रेस व लीग यांनी होमरूलबाबतची संयुक्त योजना ठरलेल्या मुदतीत सादर न केल्याने सप्टेंबर1916 मध्ये आणि बेझंट यांनी 'ऑल इंडिया होमरूल लीगची' स्थापना केली. मात्र टिळकांशी त्यांची युती असल्याने कर्नाटक, महाराष्ट्र, मध्यप्रांत वऱ्हाड हे टिळकांचे बालेकिल्ले वगळून अन्य भागात कार्य करण्याचे त्यांनी ठरवले

### होमरुलचा अर्थ :

'होमरुल' म्हणजे स्वराज्यप्राप्ती होय. आपल्या देशाचा राज्यकारभार करण्याचा अधिकार आपण प्राप्त करुन घेणे म्हणजे होमरुल होय. होमरुलची चळवळ ही मूळात आयर्लंडधील लोकांनी ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी जोखडातून मुक्त होण्यासाठी श्रीरेडमंड यांच्या नेतृत्त्वाखाली आयरिश लोकांनी सुरू केलेली होती श्रीमती ॲनी बेझंट याही जन्माने आयरिश होत्या त्यांनी या चळवळीचे बारकाईने निरीक्षण केलेले होते. भारत व आयर्लंड या दोन देशांची राजकीय समस्या सारखीच असल्याने आयर्लंडप्रमाणे भारततही होमरुल चळवळ सुरू केली तर भारतीय लोकांत जागृती निर्माण होईल असे बेझंट यांना वाटत होतेइंग्लंड व जर्मनीत त्यांचे शिक्षण पूर्ण झालेइंग्लंडधील आगपेट्यांच्या कारखान्यात काम करणाऱ्या स्त्रियांच्या हक्कासाठी त्यांनी त्या ठिकाणी चळवळ सुरू केली सन १८९३ मध्ये त्यांनी शिकागो येथील धर्म परिषदेत सहभाग घेतला त्यावेळी स्वामी विवेकानंदानी केलेल्या भाषणामुळे त्या हिंदु धर्म व संस्कृतीकडे आकर्षित झाल्यसन १८९३ मध्ये बेझंट भारतात आल्या भारतात आल्यानंतर सन १८९३ ते १९१२ या काळात थिऑसॉफिकल सोसायटीचे कार्य केले. प्राचीन धर्मग्रंथांचा अभ्यास करण्यासाठी बनारस येथेसेंट्रल हिंदू कॉलेज स्थापन केले. पुढे सन१९१३ मध्ये त्यांनी काँग्रेसचे सदस्यत्व स्वीकारले राजकीय जीवनात कार्यरत असताना त्यांनी काँग्रेसकडे होमरुल चळवळ सुरू करावी अशी मागणी केली. परंतु काँग्रेसमधून त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. भारताला स्वराज्याचे हक्क मिळाले पाहिजेत अशी भूमिका घेऊन त्यांनीहोमरूल लीग ची स्थापना केली .

### होमरूल लीगची स्थापना :

1915 मध्ये मुंबई येथे झालेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनामध्ये ऍनी बेझंट यांनी होमरूल लीग चा प्रस्ताव मांडला होता भारत युद्ध कार्यात ब्रिटिशांची करत असलेल्या मदतीच्या मोबदल्यात ब्रिटिश सरकारने भारतीयांना राजकीय अधिकार द्यावेत अशी यांची मागणी होती. परंतु होमरूल लीग ही राष्ट्रीय सभेला पूरक संघटना आहे ही मागणी नेमस्तानी फेटाळून लावली लोकमान्य टिळकांची तुरुंगातून सुटका झाल्यानंतर टिळकांनी या चळवळीस पाठिंबा दर्शविला शेवटी सप्टेंबर 1916 मध्ये ऍनी बेझंट यांनी होमरूल लीग नावाची संघटना मद्रास येथे स्थापन केली. तत्पूर्वी 1 एप्रिल, 1916 रोजी लोकमान्य टिळकांनी पुणे येथे होमरूल लीगची स्थापना केली अल्पावधीतच कलकत्ता, मद्रास, कानपूर व अलाहाबाद इत्यादी ठिकाणी होमरुल लीगच्या शाखा स्थापन झाल्या. मोतीलाल नेहरू, जवाहरलाल नेहरू, चित्तरंजन दास, मनमोहन मालवीय, भुलाभाई देसाई मोहम्मद अली जिना, तेज बहादूर सप्रू इत्यादी प्रमुख राष्ट्रवादी नेते लीगमध्ये सामील झाले. महत्त्वाच्या नेत्यांची स्थानिक शाखांच्या प्रमुखांची नियुक्ती करण्यात आली

होमरूल ही राष्ट्रीय काँग्रेसच्या विरोधी नसून पुरक अशी संघटना होती तिचे ध्येयही स्वराज्य हेच होते. निशस्त्र प्रतिकार व असहकार या तत्त्वावर ही चळवळ होती. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य ही मागणी होमरूल लीग मार्फत लोकमान्य टिळकांनी केली होती साम्राज्यांतर्गत स्वराज्याच्यानंतर संपूर्ण स्वातंत्र्य त्यानंतरचा टप्पा आहे असे त्यांचे मत होते

### होमरुल चळवळ व लोकमान्य टिळक

लोकमान्य टिळकांची सन १९१४ मध्ये मांडलेल्या तुरुंगातून सुटका केली ब्रिटिश सरकार या काळात पहिल्या महायुद्धात गुंतलेले होते. परंतु भारतीय स्वातंत्र्य चळवळ मंदावलेली होतीपहिल्या महायुद्धातील भारतीयांच्या सहकार्याबद्दल ब्रिटिशांच्याकडून जास्तीत जास्त राजकीय हक्क मिळाले पाहिजे असे टिळकांना वाटत होते राजकीय हक्काची मागणी करण्यासाठी स्वातंत्र्य चळवळ अधिक गतीशील झाली पाहिजे व हे काम काँग्रेस अंतर्गत व्हावे असे टिळकांना वाटत होतेडॉ. बेझंट टिळकांच्या काँग्रेस प्रवेशाबाबत आग्रही होत्या परंतु

फिरोजशहा मेहतांच्या विरोधामुळे असे करणे शक्य झाले नाही टिळकांना राष्ट्रीय चळवळ अधिक गतीमान करण्याची गरज वाटत असल्याने डॉ. बेझंट यांची 'होमरूल'ची संकल्पना उचलून धरली २८ एप्रिल १९१६ रोजी बेळगाव येथे भरलेल्या बैठकीत 'होमरूल लीग'ची स्थापना केल्याचे घोषित केले व त्याचे कार्यालय पुणे येथे ठेवले. जोसेफ बॉप्टीस्टा यांना लीगीचे अध्यक्ष नेमले व न. चि. केळकर यांना सचिव म्हणून घोषित केले. दादासाहेब खापर्डे, डॉ. मुंजे, शि. ल. करंदीकर इत्यादी मंडळी या संघटनेच्या प्रमुख कार्यकर्त्यांपैकी होते

बॅ. महमद अली जीना, शौकत अली यांच्यासारखे मोठे नेतेहीया चळवळीत सामील झालेले होते. पश्चिम भारतात या चळवळीचा फार मोठा प्रसार झाला. जनतेच्या वाढत्या प्रक्षोभामुळे अस्वस्थ झालेल्या गव्हर्नर जनरलने भारतमंत्र्यास कळविले की, ''इंग्लंडने भारतास स्वराज्य द्यावे अशी मागणी टिळक व बेझंट करत आहेत. त्यांचा जबरदस्त प्रभाव जनमानसावर पडत आहे. राष्ट्रीय चळवळीपासून दूर असणारे उच्चभ्रू देखील यास पाठिंबा देत आहेत यावर एकच उपाय म्हणजे भारतास राजकीय अधिकार देण्याबाबतची घोषणा करणे होय.'' लोकमान्य टिळकांनी डॉ. बेझंट बाई यांच्या सुटकेसाठी सत्याग्रह करणार असल्याचे कळल्यानंतर डॉ बेझंट यांची सुटका करण्यात आली व वाढता असंतोष कमी करण्यासाठी मॉटेग्यू यांने२० ऑगस्ट १९१७ रोजी भारतास जबाबदार सरकार देण्याचे धोरण जाहीर केले

## होमरूल चळवळीची उदिष्टे व कार्य:

भारतीय स्वातंत्र्यलढ्याला अधिक गतिमान करण्यासाठी त्यांच्यामध्ये राजकीय हक्काची व स्वशासनाबाबतची जागृती निर्माण करण्यासाठी देशभर प्रचार दौरे करणे , व्याख्यानाद्वारे जनमत निर्माण करणे ही उद्दिष्ट्ये होमरूल चळवळीच्या स्थापनेमागे होते. होमरूल लीगच्या स्थापनेनंतर त्याच्या अनेक शाखा देशभर व देशाच्या बाहेरही स्थापन झाल्या लोकमान्य टिळकांनी मुंबई कर्नाटक, विदर्भ व मध्य प्रांत हे कार्यक्षेत्र ठेवून दौरे केले होमरुल संबंधी आपली भूमिका विशद करताना टिळक म्हणतात की, ''होमरुल किंवा स्वराज्याचे तत्त्व १९०६ सालीच कॉंग्रेसला मान्य झाले आहे. पण कॉंग्रेस चे अधिवेशन वर्षातून एकदा भरत असल्यामुळे या राष्ट्रीय ध्येयास व्यवस्थित रूप देऊन त्यासाठी जे प्रयत्न करावयास पाहिजेत, त्यासाठी कॉंग्रेसने अद्याप काही तजवीज केलेली नाही. ही तजवीज करणे हे होमरुल लीग किंवा हिंदी स्वराज्य संघाचेमुख्य काम होय. यात कॉंग्रेसला विरोध नाही, इतकेच नव्हे तर हिंदुस्थानातील निरनिराळया प्रांतात निरनिराळे स्वराज्य संघ निघाले तरी त्यांच्यामध्ये परस्पर विरोध होणे शक्य नाही''

ॲनी बेझंट यांनी भारताला स्वराज्याचे हक्क मिळालेच पाहिजेत अशा स्वरुपाची परखड भूमिकाआपल्या वृत्तपत्रातून मांडली त्यांच्या मते होमरुल म्हणजे जबाबदार शासनपद्धती होय टिळकांनी केसरी व मराठा या वृत्तपत्रातून होमरुल चळवळीचा प्रचार केला सन 1916 मध्ये देशव्यापी दौरा काढून होमरुल संबंधी आपली भूमिका मांडण्याचे काम टिळकांनी केल्यामुळे मोठ्या प्रमाणात सुशिक्षित वर्ग होमरूल चळवळीकडे आकर्षित झाला. सन 1916 मध्ये टिळकांनी स्थापन केलेल्या लीगचे 14000 सभासद होते तर ही संख्या सन 1917 मध्ये 33000 वर गेलेली होती. सन 1917 मध्ये लोकमान्य टिळकांनी होमरुल लीगचे नाशिक येथे अधिवेशन घेतले या अधिवेशनानंतर लीगचे कार्यकर्ते संपूर्ण देशभर प्रचार व प्रसाराचे काम करु लागले सर्वसामान्य माणसांपर्यंत होमरूल चळवळीद्वारे लोक जागृती निर्माण करण्याचे प्रयत्न केले. जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी स्वराज्याची गरज प्रतिपादित केली. लोकांमध्ये आत्मविश्वास, राष्ट्रीयत्व व राष्ट्रप्रेम निर्माण करण्याचे काम होमरूल लीग ने केले.

## होमरुल लीगचे परदेशातील कार्य

लोकमान्य टिळकांनी स्वत:च होमरुल चळवळीसाठी इंग्लंडला जाण्याचा निर्णय घेतला टिळक, न. चि. केळकर, दादासाहेब खापर्डे, बिपिनचंद्र पाल इत्यादी मंडळी इंग्लंडला जाण्यास निघाली मात्र त्यांचे पासपोर्ट रद्द केल्याने मधून परत यावे लागले. टिळकांनी यानंतरही हार न मानता लाला लजपतराय, एस. एस. हार्डीकर व के. डी. शास्त्री यांना अमेरिकेस पाठविले या नेत्यांनी भारतीय होमरुल चळवळीची भूमिका अमेरिकन जनतेसमोर मांडली सॅन फ्रांन्सिस्को येथे होमरूल लीगची शाखा स्थापन केली व भारतीय स्वराजाच्या प्रश्नासंदर्भात अमेरिकन जनतेचा विश्वास संपादण्यात यश मिळवले परिणामी भारतीय होमरुल चळवळीला जागतिक स्वरुप येण्यास मदत झाली.

## जोसेफ बॅप्टिस्टा व होमरुल चळवळ

लोकमान्य टिळकांचे विश्वासू सहकारी व होमरुल चळवळीचे खंदेपुरस्कर्ते म्हणून जोसेफ बॅप्टिस्टा ओळखले जातात केंब्रिज विद्यापीठातून बॅप्टिस्टा यांनी कायद्याची पदवी घेतलेली होती मूळचे हिंदू सारस्वत पठारे असलेल्या बॅप्टिस्टा यांच्या कुटूंबियांनी ख्रिश्चन धर्म

स्विकारलेला होता. टिळकांच्या कार्यावर प्रभावित होऊन बॅप्टिस्टा टिळकांच्या कार्याकडे आकर्षित झाले. टिळकांचे राजकीय सल्लागार म्हणून त्यांची ओळख निर्माण झालेली होती टिळकांनी होमरुल लीगची स्थापन केल्यानंतर जोसेफ बॅप्टिस्टा यांना अध्यक्ष म्हणून नियुक्त केले. होमरुलचा प्रसार करण्यासाठी नंतर ते इंग्लंडला गेले इंग्लंडध्ये भारतीय होमरुल चळवळीचे कार्य व प्रश्न इंग्लंडच्या पार्लमेंटपर्यंत पोहचवण्यात व पार्लमेंटच्या सदस्यांचा पाठिंबा मिळवण्यात त्यांना यश आले जोसेफ बॅप्टिस्टा यांनी भारतीय मजूर चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. अखिल भारतीय मजूर संघाच्या स्थापनेमध्ये त्यांचाही मोठा सहभाग होता. मजूर वर्गाचा प्रतिनिधी, मजूरांच्या प्रश्नाबद्दल आस्था असणारा नेता म्हणून त्यांची ओळख होती. मुंबईमधील मंजूर संघाचे ते अध्यक्ष होते 'ईस्ट इंडिया' नावाचे मासिक त्यांनी सुरू केलेले होते. टिळकांच्या मृत्युनंतर टिळक अनुयायांशी त्यांचे मतभेद झाल्याने त्यांनी सक्रिय राजकारणात फारसा सहभाग घेतला नाही.

ब्रिटिशांची दडपशाही

भारत ही ब्रिटिशांची प्रमुख वसाहत असल्याने ब्रिटीश सरकार पहिल्या महायुद्धात गुंतलेले असतानाही होमरूल चळवळीद्वारे निर्माण झालेल्या असंतोषाला दडपण्याचे काम ब्रिटिशांनी केले लोकमान्य टिळक यांच्यावर मुंबई सरकारने खटला दाखल केला याच काळात डॉ. अॅनी बेझंट यांच्यावरही मद्रास सरकारने खटला दाखल केला तसेच अॅनी बेझंट यांना मुंबईत येण्यास प्रतिबंध केलाबिपिनचंद्र पाल यांना पंजाब व दिल्ली येथे येण्यास प्रतिबंद केला टिळकांच्यावर भरलेल्या खटल्यातूनटिळक निर्दोष सुटले . परंतु ब्रिटिशांनी 15 जून 1917 रोजी अॅनी बेझंट व बी. पी. वाडिया यांना अटक केली. एस. सुब्रमण्यम यांनी निषेध म्हणून'नाइटहूड' ही पदवी परत केली. त्यामुळे संपूर्ण देशात ब्रिटिशविरोधी असंतोषाची भावना निर्माण झाली . लोकमान्य टिळक यातून निर्दोष सुटले. तसेच अॅनी बेझंट यांची सुटका न केल्यास सत्याग्रहास सुरुवात करण्यात येईल असा इशारा टिळकांनी दिल्यामुळे त्यांचीही मुक्तता करण्यात आली

होमरूल चळवळीचे परिणाम:

होमरूल चळवळीस भारताप्रमाणेच परदेशातही यश मिळाले. विशेषतः अमेरिका व इंग्लंडधील उदारमतवादी नेत्यांनी व वर्तमानपत्रांनी होमरुल चळवळीस सहानुभूती दाखवली तसेच मद्रास प्रांतातील होमरुल लीगचे अध्यक्ष सर सुब्रह्मण्यम अय्यर यांनी जून 1917 मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांना पत्र पाठवून होमरुल चळवळीस मदत करण्याची विनंती केली विल्सन यांनी जी युद्धतत्त्वे घोषित केलेली होती त्यामध्ये स्वयंनिर्णयाचे तत्त्व होते या तत्त्वानुसार भारताचा स्वयंनिर्णयाचा प्रश्न सोडवावा अशी मागणी अय्यर यांनी केली. हे पत्र अनेक वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केले त्यामुळे संसदेत ब्रिटनच्या धोरणावर टीका झाली जुलै 1917 मध्ये जोसेफ बॅप्टिस्टा यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टंडळ इंग्लंडला पाठविलेया शिष्टमंडळाने इंग्लंडचा दौरा करुन भारतीय स्वराज्याचा प्रश्न ब्रिटिश जनतेपुढे मांडला. सन 1918 मध्ये टिळकांनी आणखी दोन शिष्टमंडळे इंग्लंडला पाठवण्याचे ठरविलेपरंतु त्यांच्यावर बंदी घालण्यात आल्याने ते जाऊ शकले नाही. लंडन व न्यूयॉर्क येथे होमरूलच्या शाखा काढण्यात आल्या होत्या भारतामध्ये वाढत असलेला होमरूल चळवळीचा जोर आणि त्याचा परदेशामध्ये व प्रमुख्याने अमेरिकेमध्ये होत असलेला प्रचार पाहून ब्रिटिशांनी मुत्सद्देगिरीचा वापर केला व भारतीयांना जबाबदार शासनपद्धती मध्ये राजकीय सुधारणा देण्याचे घोषित केले तत्कालीन भारतमंत्री मॉंटेग्यू यांनी20 ऑगस्ट, 1917 रोजी असे घोषित केले की आम्ही भारताला जबाबदार शासनपद्धती देणार आहोत. भारतीयांना सुधारणा देण्याचे आमचे अंतिम उद्दिष्ट आहे असे घोषित करण्यात आले. थोडक्यात होमरूल चळवळीचे खालील काही परिणाम सांगता येतील .

- मवाळवादी नेते राजकारणापासून दूर फेकले गेले व जहालाचे वर्चस्व पुन्हा निर्माण झाले
- भारतीय स्वातंत्र्य लढ्याची सूत्रे होमरुलमुळे टिळकांच्या हातात आली
- राष्ट्रीय सभेनेही ब्रिटिशाकडे स्वराज्याची मागणी करण्यास सुरुवात केली.
- होमरुल लीगने परदेशात केलेल्या कामाच्या परिणाम स्वरुप नॉटिंगहॅम परिषदेत मजूर पक्षाने भारताला वसाहतीचे स्वराज्यदेण्यात यावे असा ठराव मंजूर केला
- २० ऑगस्ट १९१७ मध्ये भारतमंत्री मॉ टेग्युने भारतात जबाबदार सरकार देण्याचे ब्रिटिशशासनाचे धोरण जाहीर केले.

**होमरुल चळवळीच्या ऱ्हासाची कारणे**

होमरुल चळवळीने अल्पावधीत आपला प्रभाव निर्माण केला व महत्त्वपूर्ण कामही केले, परंतु ही चळवळ फार काळ चालू राहिली नाही. त्यांची कारणे पुढीलप्रमाणे

- होमरुल लीगने केलेली वसाहतीच्या स्वराज्याची मागणी जहाल तरुणांना मवाळ स्वरुपाची वाटत होती. त्यामुळे त्यांच्यात निराशा पसरली.
- होमरुल चळवळीच्या शाखा फक्त भारतातील प्रुख शहरामध्ये स्थापन झाल्या त्यामुळे ही चळवळ सर्वसामान्यापर्यंत पोहचली नाही
- होमरुल चळवळीवर ब्राह्मणांचा प्रभाव आहे असा प्रचार झाला त्यामुळे बहुजन समाज या चळवळीपासून बाजूला राहिला
- राष्ट्रीय सभेचा होमरुल चळवळीला विरोध होता.
- टिळकांच्या मृत्युनंतर महात्मा गांधीचाभारतीय राजकीय पटलावर उदय झाला. गांधीजींचे नेतृत्त्व व सत्याग्रहाचे तत्त्व यामुळे होमरूल चळवळ बाजूला गेली

**निष्कर्ष :**

ॲनी बेझंट यांनी आपल्या विचाराच्या प्रसारासाठी मद्रास येथे त्यांनी सन १९१४ मध्ये 'कॉमन वील' हे साप्ताहिक व 'न्यू इंडिया' हे वृत्तपत्र सुरू केले. डॉ. बेझंट यांनी जवळपास १०० पुस्तके लिहून व जागोजागी अनेक व्याख्याने देऊन समाजप्रबोधनाचे कार्य केले थिऑसॉफिकल सोसायटीच्या कार्यकर्त्या ॲनी बेझंट यांनी आयर्लंड होमरूल लीगच्या आधारावर भारतात स्वशासन निर्माण करण्यासाठी लोकमान्य टिळकांच्या साह्याने 1916 मध्ये होमरूल लीगची स्थापना केली. लोकमान्य टिळकांनी आपले कार्यक्षेत्र म्हणून महाराष्ट्र, कर्नाटक आणि मध्य प्रांताची निवड केली. लोकांना राजकीय शिक्षण देणे, वाचनालयाची स्थापना करणे, वर्तमानपत्र, पत्रिका, जनसभा व व्याख्यानाद्वारे जनजागृती करण्याची टिळकांची पद्धत होती

ब्रिटिशांनी दिलेल्या या राजकीय सुधारणांच्या घोषणेचे नेमस्त नेत्यांनी स्वागत केले ब्रिटिशांना पाठिंबा दर्शविलापरंतु लोकमान्य टिळकांनी मात्र जबाबदार शासन पद्धतीच्या घोषणातील ब्रिटिशांचा फसवेपणा ओळखला होता म्हणूनच पंडित मदन मोहन मालवीय यांच्या अध्यक्षतेखाली दिल्ली येथील 1918 च्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात ब्रिटिश पार्लमेंटला असे आवाहन करण्यात आले की पार्लमेंटने कायदा करून भारताला वसाहतीचे स्वराज्य ताबडतोब द्यावे. अशाप्रकारे होमरूल चळवळीमुळे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला एक व्यापक जनआंदोलन व ब्रिटिशांविरुद्ध असंतोषाची भावना निर्माण करण्याचे एक साधन मिळाले होमरूल चळवळीचे सर्वात महत्वाचे योगदान म्हणजे या चळवळीने गुजरात, सिंध प्रांत, मद्रास व मध्यप्रांत या राजकीय चळवळीचा प्रभाव कमी असणाऱ्या क्षेत्रात मोठी राजकीय जागृती घडवून आणत त्यांना राष्ट्रीय आंदोलनात समाविष्ट करून घेतले थोडक्यात, होमरूल चळवळीने महात्मा गांधीजींच्या असहकार चळवळीची पार्श्वभूमी तयार करण्यास मदत केली.

टिळक केसरीमध्ये ते म्हणतात, "आपला देश हा एक विशाल वृक्ष आहे. स्वराज्य हा त्याचा बुंधा आहे आणि स्वदेशी व बहिष्कार या शाखा आहेत." थोडक्यात ब्रिटिशांशी निगडीत असलेल्या सर्व गोष्टींवर बहिष्कार घालायचा आणि ब्रिटीशांच्या प्रतिष्ठेच्या मूळावर आघात करून तिच्या विषयाचे आकर्षण नष्ट करायचे. तसेच ब्रिटिश व्यापाऱ्यांनी चालवलेल्या शोषणाला व ब्रिटिश नोकरशाहीने चालवलेल्या जुलमाला विरोध करून त्यांना राज्यकारभार करणे अशक्य करून सोडायचे हाहोमरूल चळवळीचा मुख्य हेतू होता.

**संदर्भ साधने :**


1 सुमित सरकार (1983), *मॉडर्न इंडिया, (1885-1947),* मॅकमिलन पब्लिकेशन, न्यू दिल्ली.
2 अनिल सील (1968), *द इमर्जन्स ऑफ इंडियन नॅशनॅलिझम,* केम्ब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस.
3 डॉ. विभा आठल्ये (2004), *आधुनिक भारताचा इतिहास,* अंशुल पब्लिकेशन्स, नागपूर.
4 प्रा. वसंत जाधव (2004), *आधुनिक भारताचा इतिहास,* विद्या प्रकाशन, नागपूर
5 डॉ. राजेश कुमार (2011), *आधुनिक भारत,* अल्फा पब्लिकेशन्स, नई दिल्ली.
6 डॉ. एस. एस. गाठाळ (2004), *भारताचा इतिहास,* कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
7 एल. पी. शर्मा (1975), *आधुनिक भारत,* लक्ष्मीनारायण अग्रवाल, आगरा.
8 डॉ. जयसिंगराव पवार (2012), *भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास,* सुधारित बारावी आवृत्ती, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

9 एस आर मेहरोत्रा (1971), *'दि इमर्जन्स ऑफ इंडियन नॅशनल कॉंग्रेस',* विकास पब्लिकेशन, न्यू दिल्ली.

10 य. ना. कदम (2005), *आधुनिक भारत,* फडके प्रकाशन, कोल्हापूर.

11 डॉ. एस. एल. नागोरी एंव कांता नागोरी (2012), *विदेशो में भारतीय स्वतंत्रता सेनानी* प्रथम संस्करण, राज पब्लिशिंग हाऊस, जयपुर.

12 दीपक कुमार (2010), *आधुनिक भारत का संपूर्ण* इतिहास, प्रथम संस्करण, राज पब्लिशिंग हाऊस, जयपुर